17th Edition
HGH INDIA® 2025
HOME DECOR ▪▪▪ GIFTS ▪▪▪ HOUSEWARE
July 01-04, 2025. Bombay Exhibition Center, Mumbai

NEWS 3

A TEXZONE Event

Where business feels at home!

# होम फर्निचर आणि सजावट, हाउसवेयर, गिफ्ट्स क्षेत्रातले नवे ट्रेंड्स

*नाविन्यपूर्ण उत्पादनांची परंपरा १७ व्या HGH India मध्येही कायम ठेवली जाणार असून न्यूज २ आणि न्यूज ३ मध्ये आम्ही होम फर्निचर आणि सजावट, हाउसवेयर्स तसेच गिफ्ट क्षेत्रातले नवे ट्रेंड्स सांगणार आहोत.*

## होम फर्निचर आणि सजावट

### ऑरेंज ट्री: अंदमान जॉली ब्वॉय बार युनिट

ऑरेंज ट्रीद्वारे HGH India मध्ये अंदमान कलेक्शन सादर केले जाणार असून त्यात पारंपरिक कलाकुसर आणि जागतिक पातळीवरील डिझाइन्स यांचा मेळ घातलेला असेल.

हे कलेक्शन स्वातंत्र्य आणि कारागिरीची अभिव्यक्ती आहे. कलात्मक इमेजरीच्या माध्यमातून इनडोअर व आउटडोअर वातावरण सहजपणे एकमेकांत मिसळतात, फॉर्मल इनडोअर सेटिंगसाठी वाळू, दगड आणि झाडांसारख्या नैसर्गिक घटकांचा समावेश तर इनडोअर फर्निचरला आउटडोअर वातावरणात असलेला वाव यातून दिसून येणार आहे. नोमॅडिक आणि मॉडर्न अशा दोन शब्दांच्या एकत्रीकरणातून तयार करण्यात आलेली 'नोमॅडर्न' ही संकल्पना दोन पूर्णतः वेगळ्या व वैशिष्ट्यपूर्ण विश्वांचा मेळ सुचवणारी आहे. नोमॅडिक अनुभूतीमधून आदिवासी – आपल्या मुळांची आठवण करून देणाऱ्या भावना जाग्या होतात, तर मॉडर्न टच समकालीन सौंदर्याचा समावेश करण्याचं स्वातंत्र्य देतो. या दोन विश्वांचं विचारपूर्वक घालण्यात आलेला मेळ डिझाइन टीमचं विरोधात्मक घटकांची सांगड घालून लक्ष वेधून घेण्याचं व्हिजन दर्शवतो.



Andaman Jolly Buoy Bar Unit

फर्निचर, लायटिंग आणि डेकॉरसाठी प्रसिद्ध आहे. २६ वर्षांचा इतिहास लाभलेल्या बसंत या पेरेंट कंपनीद्वारे १९८८ पासून २० पेक्षा जास्त देशांत निर्यात करण्यात येते.

२०१४ मध्ये स्थापन करण्यात आलेले ऑरेंज ट्री जागतिक डिझाइन आणि दर्जा देशांतर्गत बाजारपेठेत आणत आहे. ९ लाख चौरस फुटांच्या प्रशस्त जागेत वसलेल्या अत्याधुनिक फॅक्टरीद्वारे एच अँड एम होम्स, झारा होम्स, पॉटरी बार्न, वेस्ट एल्म व क्रिएट अँड बॅरल अशा प्रसिद्ध ब्रँड्सना सेवा दिली जाते. खरेदी व डिझाइन टीम्ससह सहकार्याच्या शोधात आहे.

### फिग लिव्हिंगचे क्युरेटेड लायटिंग

इनमार्क एक्स्पोर्ट्स प्रा. लि. चे फिग लिव्हिंग हा डिझाइन- फर्स्ट ब्रँड असून तो अभिजातता आणि साधेपणाला प्राधान्य देत लायटिंग व लिव्हिंग इसेन्शियल्स उपलब्ध करणारा आहे. भारतात बनवला आणि डिझाइन केला जाणारा हा ब्रँड मूळ संकल्पना, नाविन्यपूर्ण साहित्य, उपयुक्तता व सौंदर्याचा मिलाफ यावर लक्ष रेंद्रित करतो. गृह विभागात ३० पेक्षा जास्त पेटंट्स असलेला फिग लिव्हिंग ब्रँड अस्सल डिझाइन आणि कारागिरीचे प्रतीक आहे.





Fig Living

### एकानी

एकानी हा प्रीमियम भारतीय लाइफस्टाइल आणि होम डेकॉर ब्रँड असून त्याची स्थापना २०१० मध्ये करण्यात आली होती. पारंपरिक सौंदर्याला आधुनिक, आलिशान साज चढवण्याचे त्यांचे ध्येय आहे. भारताची श्रीमंत संस्कृती आणि जागतिक कलाकुसरीप्रती जिव्हाळा यांच्या संगमातून एकानी कलेक्शनद्वारे अर्थपूर्ण, सुंदर आणि अभिव्यक्तीसाठी वाव देणाऱ्या जागा तयार केल्या जातात.





Murano Collection

मुरानो कलेक्शनमध्ये इटलीत तयार करण्यात आलेले आणि कित्येक शतकं जुन्या मुरानो ग्लासमेकिंगपासून प्रेरणा घेऊन बनवण्यात आलेल्या आर्टिसनल ग्लास पिसेसचा समावेश आहे. हे कलेक्शन युरोपीय कलाकुसरीच्या संग्रहांसाठी योग्य आहे.

ब्राझिलियन बर्ड्स कलेक्शनद्वारे ऑरगॅनिक सौंदर्याचा पक्ष्यांच्या नाजूक कलाकुसरीसह, ब्राझिलमधून आणल्या गेलेल्या सेमी-प्रेशियस स्टोन्ससह मेळ घालण्यात आला असून त्याद्वारे अभिजातता, शांतता आणि निसर्गाचे खरे सौंदर्य प्रतीत होते.



The Brazilian Birds Collection

एलिफंट परेड कलेक्शन हा जागतिक स्तरावर नावाजलेला उपक्रम मूळचा नेदरलँड्सचा असून त्यात कला, संवर्धन आणि संस्कृती यांचा समावेश करण्यात आला आहे. प्रत्येक कलाकृती शक्ती आणि वारसा यांचे प्रतीक असून कलात्मक अभिव्यक्तीद्वारे हत्तींच्या कल्याणासाठी पाठिंबा देते.



The Elephant Parade Collection

होम फर्निशिंग कलेक्शनमध्ये इकत, मुघल मोतिफ्स, निसर्ग, प्राणी, फुले अशा कलात्मक संकल्पनांपासून प्रेरणा घेण्यात आली आहे. हे कलेक्शन आरामदायीपणा, सौंदर्य, मनःशांतीचा आधुनिक पद्धतीच्या इंटेरियर्समध्ये समावेश करणारे आहे.

**कंटेम्परररी ▪ फ्युचरिस्टिक ▪ सस्टेनेबल**

दमदार पॅन- इंडिया नेटवर्क आणि दर्जाप्रती दृढ बांधिलकी यांच्या जोरावर एकानी हे लक्झरियस गिफ्टिंग आणि उच्च अभिरुचीपूर्ण राहाणीमानासाठीचे विश्वासार्ह नाव बनेले आहे. याचे प्रत्येक कलेक्शन परंपरा व नाविन्याचा मेळ घालणारे आहे.


Home Furnishing Collection

## हाउसवेयर

### अंजली किचनवेयर

५० वा वर्धापनदिन साजरा करण्यासाठी अंजली किचनवेयरद्वारे न्युट्रिकॉनचे अनावरण करण्यात येणार असून प्रेशर कुकिंगमध्ये नवा अध्याय सुरू केला जात आहे. निसर्गातील पाच घटकांपासून प्रेरणा घेत यात हेतू, कामगिरी आणि विचारपूर्वक तयार करण्यात आलेले डिझाइन यांचा मेळ घालण्यात आला आहे. न्युट्रीकॉन हे नाव दोन मार्गदर्शक संकल्पनांतून तयार करण्यात आले आहे – न्युट्री म्हणजेच पोषण आणि आयकॉन म्हणजेच आधुनिक भारतीय स्वयंपाकघरात गुणवत्तेचा मापदंड तयार करणारे कुकवेयर्स. हा ब्रँड पोषक स्वयंपाक, सोयीस्करपणा आणि रोजच्या जेवणातली पोषणमूल्ये टिकवण्यावर भर देणारा आहे.

न्युट्रीकॉन प्रेशर कुकर रेंजसाठीचे ग्रीक नाव उत्पादनाच्या पाच घटकांच्या श्रेणीशी सुसंगत आहे. त्याशिवाय या संपूर्ण रेंजमधली नावे ग्रीक नावांपासून प्रेरणा घेत सहेतुक आहेत.

न्युट्रीकॉन रेंजमधील प्रत्येक धातूचा रंग निसर्गाच्या एका घटकाचे प्रतिनिधीत्व करणारा आहे –

- अॅक्वा (ब्लू- स्टेनलेस स्टील) पाण्यासारखे नितळ – रोजच्या वापरासाठी योग्य
- एयरो (पिवळा - ॲल्युमिनियम) वाऱ्यासारखे हलके आणि चपळ – प्रत्येक बाबतीत मजबूत
- टेरा (हिरवा – ट्रायप्लाय मेटल) पृथ्वीसारखे समतोल – ताकद आणि संवेदनशीलतेचे फ्युजन
- इग्निस (लाल – हार्ड अनोडाइज्ड) आगीसारखे बोल्ड – दीर्घकाळ टिकणारे


Nutricon Range

## हायटेक गिरो X बाय बर्गनर

डिसेंबर २०२४ मध्ये बेंगळुरू HGH India मध्ये आरजेंट समसारा रेंज लाँचला मिळालेल्या भरघोस प्रतिसादानंतर पारंपरिक दाक्षिणात्य कुकवेयर शेप्स आणि ट्राय- प्लाय क्वान्टानियम नॉन- स्टिक परफॉर्मन्स साजरा करत बर्गनर इंडिया आणखी नाविन्यपूर्ण उत्पादनांसह HGH India मुंबईमध्ये सहभागी होत आहे.

हायटेक गिरो X ही हाय- परफॉर्मन्स कुकवेयर रेंज असून त्यामध्ये ट्राय- प्लाय कन्स्ट्रक्शनचा सिरॅमिक कोटिंगसह मेळ घालण्यात आला आहे. बर्गनर ही रेंज उष्णतेचे समान वितरण, सुरक्षित कुकिंग आणि दीर्घकाळ टिकण्यासाठी तसेच भारतातील स्वयंपाक बनवण्याचा अनुभव नव्याने तयार करण्यासाठी बनवली आहे.

मास्टरशेफ विकास खन्ना पँज अम्बेसिडर असलेले बर्गनर भारतात अप्लायन्सेस विभागात आपले अस्तित्व विस्तारण्यासाठी सज्ज आहे. त्यासाठी कंपनीने इंट्युटिव्ह उत्पादनांसह रोजचा स्वयंपाक बनवण्याची पद्धत अधिक स्मार्ट, वेगवान आणि निरोगी करण्याचे ठरवले आहे. कंपनीने त्यांचे लोकप्रिय कास्ट आयर्न कलेक्शनही विस्तारले असून त्यात स्वादिष्ट, स्लो कुकिंगला आधुनिक टच देण्यात आला आहे.


Hitech Giro X

बर्गनर इंडियानुसार हे कुकवेयर उपयुक्त आहेच, शिवाय त्यातून स्वयंपाक बनवण्याचा आनंद वाढतो तसेच कुटुंबाच्या आरोग्याला प्राधान्य देता येते.

## ला क्रुसेटतर्फे १०० वर्ष साजरी

१९२५ मध्ये फ्रेसनॉय- ला- ग्रँड, फ्रान्स येथे स्थापना झाल्यापासून ला क्रुसेटचे कुकवेयर जगभरात लोकप्रिय झाले आहेत. डिझाइन कौशल्य, अनोखी टाइल व जबरदस्त परफॉर्मन्ससाठी प्रसिद्ध असलेली ही कुकवेयर्स शतकभराची गुणवत्ता साजरी करत असून स्वयंपाकघर असो किंवा डायनिंग टेबल, सर्वत्र खाद्यपदार्थांच्या परंपरा तयार करत आहे.

कुशल कारागिरांतर्फे कास्ट- आयर्नपासून बनवले जाणारे ला क्रुसेट पिढीजात वारसा बनत असून त्याद्वारे वर्षामागून वर्ष एकमेकांसोबत घेतलेल्या जेवणाची आठवण आणि त्यातून तयार झालेली वैयक्तिक नाती साजरी केली जात आहे.

'हा ऐतिहासिक टप्पा आमचा वारसा तसेच जगभरातील स्वयंपाकघरात आम्हाला असलेले स्थान सन्मानित करणारा आहेच, शिवाय त्यातून नाविन्य, गुणवत्ता आणि खाद्यपदार्थांसाठीची प्रेरणा यांप्रती आमची बांधिलकी दिसून येते. आमची उत्पादने आठवणी तयार करतात आणि कित्येक पिढ्यांसाठी खाद्यपदार्थांचा वारसा जतन करतात,' असे ला क्रुसेटचे ओनर आणि अध्यक्ष पॉल व्हॅन झायडॅम यांनी सांगितले.

## प्रसिद्ध आयकॉन, नव्या रूपात

नाविन्य आणि प्रगतीशील विचारसरणी यांवर भर देत ला क्रुसेटने रंगीत कुकवेयरची फ्लामे डोरी ही नवी श्रेणी उपलब्ध केली आहे गोल्डन फ्लेम – सोनेरी ज्वाळा असा अर्थ असलेल्या नावाची ही शताब्दी विशेष लिमिटेड एडिशन ब्रँडच्या प्रसिद्ध आणि मूळ रंगात उपलब्ध करण्यात आली असून त्याला लाइट कॅचिंग मिनरल्सने कोटिंग करण्यात आले आहे, तर आकर्षक सोनेरी फिनिशसाठी


Flamme Dorée

इनॅमल कोटिंगचा तिसरा थरही देण्यात आला आहे. 'हे नवीन, लिमिटेड आणि उत्सवी एडिशन ब्रँडच्या सातत्याने विस्तारत असलेल्या उत्पादन श्रेणीत समाविष्ट होत आहे. कंपनीची श्रेणी सातत्याने विस्तारत असून स्थापनेपासून त्यात २०० आकर्षक रंगछटा आणि १००० उत्पादन आकारांचा समावेश झाला आहे,' असे ला क्रुसेटचे ओनर आणि अध्यक्ष पॉल व्हॅन झायडॅम म्हणाले.

## सीबा इंडस्ट्रीज

सीबाद्वारे किचन आणि होमवेयर क्षेत्रातील काही सर्वोत्तम जागतिक कंपन्यांची उत्पादने एक्सक्लुसिव्ह पातळीवर उपलब्ध केली जाणार आहेत. प्रेपवेयरपासून कुकवेयर, टेबलवेयर, सर्व्हेवेयर, बारवेयर, मुलांसाठी उत्पादने यांचा त्यात समावेश आहे. एकत्रितपणे सीबाच्या श्रेणीत १५०० एसकेयूज आणि ६०,००० पेक्षा जास्त उत्पादनांचा समावेश आहे.

त्यांच्या ब्रँड पोर्टफोलिओमद्ये थिनकिचन (त्यांचा स्वतःचा ब्रँड), जोसेफ जोसेफ किल्नर, बारक्राफ्ट, ला कॅफेटियर, किचनक्राफ्ट, डार्टिंग्टन, डेन्बी, टायफून, मास्टरक्लास, व्हायनर्स, रॉयल ब्रियर्ली, रेवनहेड आणि कोल अँड मेसन (सर्व युकेचे), किचनएड, झोकू, मिकासा (सर्व अमेरिकेचे), ब्राबान्तिया (नेदरलँड्स), ड्रीमफार्म (ऑस्ट्रेलिया), फायनल टच (कॅनडा), व्हिक्टोरिया (कोलंबिया) आणि झायलिस (स्वित्झर्लंड) यांचा समावेश आहे. ब्रँडचा काळजीपूर्वक तयार केलेला पोर्टफोलिओ आणि एसकेयूज वेगाने


Joseph Joseph

विस्तारत आहेत व प्रीमियम भारतीय ग्राहकाला सर्वोत्तम रेंज मिळवून दिली जात आहे.

थिनकिचनद्वारे भारतीय बाजारपेठेला विविध चॅनेल्सद्वारे सेवा दिली जाते. त्यात ऑफलाइन रिटेल (प्रीमियम जनरल आणि आधुनिक व्यवसाय, ऑनलाइन, कॉर्पोरेट गिफ्टिंग आणि प्रीमियम हॉस्पिटॅलिटी यांचा त्यात समावेश असून या प्रत्येक विभागासाठी हा ब्रँड एकाच छताखाली विविध सेवा देतो.



Kilner

सीबा आपल्या जागतिक दर्जाच्या किचनवेयर स्टाइल आणि उपयुक्त उत्पादनांच्या मदतीने स्वयंपाकघर व एकंदर घराचा आनंदी अनुभव तयार करण्यासाठी बांधील आहे.

## डोझो सर्व्हिसेस

उत्पादने आणि सेवांच्या माध्यमातून जीवनशैली, व्यवसाय आणि समाजाला संस्कृतीचा साज देण्याच्या ध्येयाने डोझोद्वारे तीन नवीन कलेक्शन्स सादर केली जातील - रिडेल, स्पीगेलो आणि ऑक्सो.

### रिडेल

रिडेल ही जगप्रसिद्ध ऑस्ट्रियन ग्लासमेकर कंपनी असून वाइनसाठी ग्लासेस बनवण्यासाठी प्रसिद्ध आहे. १७५६ मध्ये स्थापन झालेल्या या ब्रँडने वेगवेगळ्या स्वाद, सुगंध आणि एकंदर अनुभव उंचावण्यासाठी खास ग्लासेसची निर्मिती सुरु करत क्रांती आणली. जगभरात सॉमेलियर्स, वाइन प्रोफेशनल्स आणि लक्झरी हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील विश्वासार्ह नाव असलेल्या रिडेलमध्ये परंपरा, नाविन्य आणि अभिजातता यांतचा प्रत्येक उत्पादनामध्ये समावेश केलेला असतो.

HGH India मध्ये डोझो लक्षवेधक रिडेल लॉडन टम्बलर्स आलिशान कट- क्रिस्टल डिझाइनमध्ये सादर करणार असून त्यात परावर्तित होणाऱ्या प्रकाशामुळे टम्बलर्स चमकदार दिसात. रिडेल डिकँटर्स ही श्रेणी प्रीमियम क्रिस्टलपासून तयार केली असून ती डिकन्टिंग कलेचा सर्वोच्च नमुना आहे. रिटेल फॅटो ही वाइन ग्लासेसची श्रेणी जबरदस्त कारागिरी आणि आधुनिक मशिन उत्पादन यांचा मेळ घालणारी आहे.



RIEDEL Decanter

### स्पीगेलो

स्पीगेलो या जर्मन ग्लासवेयर ब्रँडला ५०० वर्षांचा वारसा लाभला असून त्यात कालातीत कलाकुसर आणि आधुनिक नाविन्याचा संगम साधण्यात आला आहे. जबरदस्त पारदर्शकता आणि टिकाऊ डिझाइनसाठी ओळखले जाणारे स्पीगेलो अभिजात वाइन, बियर आणि कॉकटेल ग्लासेसची निर्मिती करते आणि त्यातून घेतला जाणाऱ्या प्रत्येक घोटाचा स्वाद उंचावते.

स्पीगेलोद्वारे फिकट रंगाच्या आणि जास्त असिडिटी व माफक टॅनिन असलेल्या रेड वाइन्ससाठी बरगंडी ग्लास खास तयार केले जातात. त्यामधे डोझोद्वारे स्पीगेलो लाइफस्टाइल हे मॉडर्न ग्लासवेयर कलेक्शन खास सादर केले जाणार असून त्यात वैशिष्ट्यपूर्ण लिनियर पॅटर्न आणि जबरदस्त पारदर्शकता पाहायला मिळेल. स्पीगेलो परफेक्ट सर्व्ह हे व्यावसायिक दर्जाचे ग्लासवेयर कलेक्शन असून ते



Spiegelau Lifestyle

पुरस्कार विजेते स्वीफन हिंझ यांच्या सहकार्याने आधुनिक बारसाठी खास तयार करण्यात आले आहे.

### ऑक्सो

ऑक्सो हा जागतिक पातळीवरील प्रसिद्ध, स्मार्ट पद्धतीने डिझाइन करण्यात आलेल्या युजर- फ्रेंडली किचन्स व घरगुती टुल्सचा ब्रँड आहे. वैश्विक डिझाइन या संकल्पनेवर आधारित ऑक्सोद्वारे आरामदायी, टिकाऊ आणि दैनंदिन कामं प्रत्येकासाठी सोपी करणारी उत्पादने तयार केली जातात.

ऑक्सो व्ही- ब्लेड मँडोलिन स्लाइसरमधील चारपैकी कोणतेही एक ब्लेड आणि हाइट अडजस्टर वापरा व फळ तसेच भाज्यांचे परफेक्ट स्लाइसेस किंवा ज्युलिएन्स तयार करा. याचा विशिष्ट पृष्ठभाग खाद्यपदार्थ चिकटू देत नाही आणि खाद्यपदार्थ घट्ट पकडून ठेवत बोटांना इजा होऊ देत नाही. नंतर याची घडी घालून सुरक्षितपणे ठेवून द्या. तुम्हाला सरळ ब्लेड्स वापरुनही फ्रेंच फ्राइज किंवा ज्युलिएन स्ट्रिप्ससाठी स्लायसिंग करता येते.



V-Blade Mandoline Slicer

## मॅगिक – फोर ब्राउन फोक डेकॉरसाठी विशिंग चेयर

फोर ब्राउन फोक डेकॉरद्वारे मॅगिक कलेक्शन – विशिंग चेयरच्या मदतीने चहाचा नवा आणि आलिशान अनुभव घ्या. यामध्ये अभिजातता आणि उपयुक्तता यांचा अनोखा मेळ घालण्यात आला आहे.

मॅगिक पोट्रेट ऑफ अ रोज टी सेट आणि मॅगिक रिव्हर ऑफ फ्लॉवर्स टी सेट या कलेक्शनचे वैशिष्ट्य आहे. १५ पीसेसच्या प्रत्येक सेटमध्ये ६ कप्स, टीपॉट, मिल्क पॉट, शुगरपॉट यांचा समावेश असून ते नेमकेपणा आणि आकर्षक डिझाइनसह तयार करण्यात आले आहेत. टीपॉटची क्षमता ९०० मिलीची असून पाहुण्यांना सर्व्ह करण्यासाठी तो आदर्श आहे. टीकप्सची क्षमता १३० मिलीची असून चहापानासाठी तो आदर्श आहे. दर्जेदार सिरॅमिकपासून बनवण्यात आलेला हा सेट सौंदर्य आणि टिकाऊपणा यांचे समीकरण साधणारा आहे. हे कलेक्शन मायक्रोवेव व डिशवॉशर सेफ असल्यामुळे आणखी सोयीस्कर आहे.

त्याशिवाय विंग्ज पॅराडाइज समर मग सेटमध्ये ६ फाइन चायना मग्जचा समावेश असून त्यांचे डिझाइन समर- इन्स्पायर्ड आहे. हे मग हलक्या वजनाचे, टिकाऊ आणि चहा व कॉफीसारखी गरम पेये सर्व्ह करण्यासाठी योग्य आहे. मॅगिक कलेक्शन चहाची वेळ आनंददायी बनवणारे आणि आलिशानतेचा अनुभव देणारे असल्यामुळे चहाप्रेमींना भेट देण्यासाठी किंवा घराची अभिरूची वाढवण्यासाठी आदर्श आहे. हे कलेक्शन स्टाइल आणि रोजच्या किंवा खास प्रसंगांसाठी उपयुक्ता यांचा मेळ घालणारे आहे.

## ऑप्ट्रा

ऑप्ट्रा हे कन्झ्युमर ब्रँडसाठीचे एआय- नेटिव्ह फ्रँचाईझी सोल्युशन असून त्याद्वारे आशियात विस्तार केला जाणार आहे. ऑप्ट्राद्वारे ब्रँड्सना जागतिक स्तरावर लाँच करण्यासाठी आणि वेगाने विस्तार करण्यासाठी मदत केली जाते.

बिन्नी बन्सल यांनी स्थापन केलेल्या (फ्लिपकार्टचे सह- संस्थापक)



Magique Collection

ऑप्ट्राद्वारे आधनिक एआय तंत्रज्ञान आणि कॅटेगरी व चॅनेलचे ज्ञान यांच्या मदतीने महत्त्वाकांक्षी ब्रँड्सना जागतिक स्तरावर विस्तारण्यासाठी मदत केली जाते. आमच्या एआय तंत्रज्ञानावर आधारित सुविधा कॅटलॉग क्रिएशन ऑटोमेट करतात, फोरकास्टिंग व मर्चंडायझिंगच्या मागणीला चालना देतात व उत्पादन लाँचला वेग देतात.

ब्रँडच्या सुविधेमध्ये खऱ्या अर्थाने भागिदारीचा अनुभव घेता येतो – आम्ही इनव्हेंटरी खरेदी करण्यासाठी आमचे स्वतःचे भांडवल गुंतवतो. पुरवठा साखळीची पूर्ण जबाबदारी घतो आणि प्रत्येक प्रमुख बाजारपेठ व रिटेलरपर्यंत ऑनलाइन- ऑफलाइन प्रवेश मिळवून देतो.



Opptra

# ऑम्नी रीच झोन | सस्टेनेबिलिटी पॅव्हेलियन | IIID | AFMT

वेगाने विस्तार करायचा असल्यास, ब्रँड इक्विटी उभारायची असल्यास आणि जगातील सर्वात आकर्षक गाहकोपयोगी बाजारपेठेत विस्तार करायचा असल्यास ऑम्ट्रा हा विश्वासार्ह ब्रँड आहे.

### HGH India साठी ऑम्ट्राचे ध्येय

- भारतीय ब्रँड्सना जीसीसी आणि एसईए बाजारपेठांत विस्तारण्यासाठी मदत करणे
- आंतरराष्ट्रीय ब्रँड्सना भारतात येण्यासाठी मदत करणे
- भारतातील ऑफलाइन ब्रँड्सना वेगवेगळ्या मार्केटप्लेसेस व प्लॅटफॉर्म्सवर डिजिटल अस्तित्वासाठी मदत करणे.

### धवनी पॉलिप्रिंट्स

धवनी पॉलिप्रिंट्स ही कंपनी १९७८ पासून पॉलीमर प्रक्रिया क्षेत्रात साउंड सील या ब्रँडनावाअंतर्गत कार्यरत असून कंपनीद्वारे वाइड विड्थ प्रिंटेड पॉलीबॅग्ज, मॅट्रेसेस, पिलोजसाठीचे कव्हर्स, होम डेकॉर फॅब्रिक्स, या उत्पादनांसाठी खास तयार केले जाणारे फिल्म आणि लायनर्स सादर केले जाणार आहेत. कंपनी उच्च- सुरक्षा असलेल्या बॅग्जचे उत्पादन करण्यात आघाडीवर असून एयरपोर्ट ड्युटी- फ्री एसटीईबी बॅग्ज तयार करणाऱ्या जगभरातील अगदी मोजक्या कंपन्यांपैकी एक आहे. कंपनीची उत्पादने मोठी मागणी असलेल्या बाजारपेठांत विश्वासार्ह समजली जातात व त्यात विविध युरोपीय देशांचाही समावेश आहे.

त्यांच्या विस्तारित पोर्टफोलिओमध्ये श्रिंक फिल्म्स, रिसिलेबल पॉलीबॅग्ज, झिपलॉक बॅग्ज, टेम्पर- एव्हिडंट सिक्युरिटी बॅग्ज आणि कुरियर बॅग्जचाही समावेश आहे, ज्या ई- कॉमर्स व लॉजिस्टिक्स क्षेत्रासाठी खास तयार केल्या जातात.

INDIAN INSTITUTE OF INTERIOR DESIGNERS
MUMBAI REGIONAL CHAPTER

### IIID द्वारे HGH India ला पाठिंबा कायम



**आयडी केतन शेठ**
*अध्यक्ष IIID MRC*

व्यावसायिक आर्किटेक्ट्स आणि इंटेरियर डिझायनर्सची प्रसिद्ध संघटना असलेल्या IIID MRC द्वारे HGH India सह असलेली भागिदारी सलग चौथ्या वर्षी कायम ठेवली जाणार आहे. HGH India द्वारे आर्किटेक्ट्सना ट्रेंड्सची माहिती, नाविन्यपूर्ण उत्पादने आणि होम फर्निचर, होम फर्निशिंग, डेकोरेटिव्ह अक्सेसरीज तसेच हाउसवेयर्स व किचन अप्लायन्सेसची आधुनिक श्रेणी अशा विभागांमध्ये नवीन स्रोत मिळवून देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मदत केली जाते, असे IIID MRC चे अध्यक्ष केतन शहा म्हणाले.

आघाडीचे आर्किटेक्ट्स नियमितपणे HGH India ला भेट देत आहेत, कारण येथे एकाच छताखाली डिझाइन तसेच बाजारपेठेतील आगामी ट्रेंड्सची माहिती मिळते व विविध सोर्सिंग सुविधांचा शोध घेता येतो. या ट्रेड शोमध्ये त्यांना इतरांशी व्यावसायिक पद्धतीच्या वातावरणात संवाद साधता येतो.

HGH India द्वारे परत एकदा आर्किटेक्ट्स आणि इंटेरियर डिझायनर्ससाठी HGH India इंटरॅक्टिव्ह नॉलेज शेयरिंग प्लॅटफॉर्मअंतर्गत IIID कॉन्फरन्सचे आयोजन केले जाणार आहे.

ही कॉन्फरन्स १ जुलै २०२५ रोजी ग्रँड येथे आयोजित केली जाणार असून तिथे आघाडीचे आर्किटेक्ट्स आगामी काळात डिझाइन आणि आर्किटेक्चर क्षेत्रापुढे असलेल्या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करतील. ही कॉन्फरन्स IIID सदस्यांसाठी तसेच HGH India च्या व्हिजिटर्ससाठी खुली असेल. याची तपशीलवार माहिती IIID MRC तसेच HGH India कडून मिळू शकते.

IIID द्वारे एच- सर्कल प्रॉडक्ट इनोव्हेशन पुरस्कारांसाठी पाठिंबा दिला जात असून परीक्षक मंडळात दोन आघाडीच्या आर्किटेक्ट्सचे नामांकन करण्यात आले आहे, तर १ जुलै रोजी होणार असलेल्या पुरस्कार सोहळ्यासाठी काही सदस्यांना आमंत्रित करण्यात आले आहे. आघाडीचे आर्किटेक्ट्सही या उद्घाटन समारंभाचा भाग असतील.

a · f · m · t

असोसिएशन ऑफ फर्निचर मॅन्युफॅक्चरर्स अँड ट्रेडर्स (AFMT) द्वारे HGH India ला संपूर्ण पाठिंबा दिला जात आहे. असोसिएशनमध्ये देशभरातील फर्निचर उत्पादक आणि ट्रेडर्स मोठ्या प्रमाणावर सदस्य म्हणून कार्यरत आहेत.

भारतीय बाजारपेठेतील ग्राहकांची आधुनिक तसेच पारंपरिक पद्धतीच्या फर्निचरला असलेली वाढती मागणी आणि भारतीय सरकारने काही फर्निचर विभागांसाठी बीआयएस स्टँडर्ड बंधनकारक केल्यामुळे येत्या काही वर्षांत उच्च दर्जाच्या व चांगले डिझाइन असलेल्या होम फर्निचरचे उत्पादन वाढणार आहे.

HGH India नुसार यामुळे भारतीय फर्निचर उत्पादकांना ब्रँडेड, प्रकल्प आणि ओईएम बाजारपेठांमध्ये मोठी संधी मिळणार असून त्यांनी आपल्या कामाचा प्रसार करण्यासाठी AFMT सारख्या संस्थांबरोबर काम करत राहायला हवे.

### ट्रेड व्हिजिटर्स

ऑनलाइन नोंदणी करा रु. १००० भरा
ट्रेड शोच्या ठिकाणी रांगेत
उभं राहाणं टाळण्यासाठी
**स्पॉट रजिस्ट्रेशन फी नोंदणीसाठी स्कॅन करा**

अधिक माहितीसाठी संपर्क
**अमर शर्मा:** +91 99 676 00286
+91 99 301 72973
ईमेल: visitors@hghindia.com

HGH
Let's create a
Sustainable World

अधिक पर्यावरणपूरक आणि शाश्वत भारतीय घरे पुरवण्याच्या प्रयत्नांना चालना देण्यासाठी १७ व्या HGH India मध्ये सस्टेनिबिलिटी पॅव्हेलियन हॉल 6 मध्ये सुरू करण्यात आले आहे. या ठिकाणी १० एक्झिबिटर्स रिसायकल केलेली व पर्यावरणपूरक साहित्यापासून बनवलेली उत्पादने सादर करतील. ही उत्पादने पर्यावरणपूरक उत्पादन प्रक्रिया व बायोडिग्रेडेबल साहित्य वापरून बनवलेली असतील.

हॉल 6 मधील सस्टेनिबिलिटी पॅव्हेलियनद्वारे पर्यावरणपूरक जीवनशैलीला चालना देणे, अशी जीवनशैली अंगीकारण्यास प्रणा देणे, घरगुती व्यवसायांची अधिक चांगली भविष्य निर्मिती करण्यासाठी त्यातील महत्त्वाची भूमिका अधोरेखित करण्याचे ध्येय आहे. या पॅव्हेलियनमधील एक्झिबिटर्स शाश्वतता, अभिजातता व उपयुक्तता आणि डिझाइन अशा सर्व पैलूंचा संगम साधणारी उत्पादने सादर करतील.

HGH India मधील सस्टेनिबिलिटी पॅव्हेलियन कंपन्यांना आपले सस्टेनेबल डिझाइन व उत्पादन क्षेत्रातील प्रयत्न दर्शवण्यासाठी प्लॅटफॉर्म देणारे, व्हिजिटर्सना अशाप्रकारची उत्पादने अनुभवण्याची संधी देणारे आहे. HGH India द्वारे सस्टेबिलिटी हा जगण्याचा मार्ग म्हणून प्रमोट करण्यात येत असून त्यासाठी स्टार्ट अप्स व प्रस्थापित ब्रँड्सना प्रसार करण्यासाठी मदत केली जाणार आहे.

ऑम्नी रीच झोन
AN INITIATIVE BY HGH INDIA

पुरवठासाखळीमध्ये स्पर्धा वेगाने तीव्र होत असून बहुमाध्यमिक अस्तित्व ही केवळ चैन राहिली नसून टिकून राहाण्यासाठी आवश्यक झाले आहे. आज बहुतेक ब्रँड्स आणि रिटलर्सनी – ऑनलाइन व ऑफलाइन माध्यमातून त्यांचा ग्राहकवर्ग विस्तारण्यासाठी खरेदी प्रक्रियेमध्ये प्रत्येक टचपॉइंटवर समान अनुभवाची निर्मिती करायला हवी. ऑफलाइन आणि ऑनलाइन अशा दोन्ही स्तरांवर काम करणाऱ्यांनी एकमेकांच्या कार्यक्षेत्रात प्रवेश करत परस्परांच्या लाभासाठी नव्या व्यावसायिक भागिदारी स्थापन करण्याची वेळ आली आहे. त्यांना एकमेकांच्या अनुभवाचा लाभ घेता येईल तसेच आणखी मोठ्या ग्राहकांपर्यंत पोहोचता येईल.

ऑम्नी रीच झोन हॉल 6 मध्ये असून ही नवी संकल्पना HGH India द्वारे या आवृत्तीमध्ये राबवली जात आहे. त्यामुळे ऑफलाइन तसेच ऑनलाइन कंपन्यांना त्यांचा व्यवसाय नव्या ठिकाणी घेऊन जाणे शक्य होईल.